पशुचिकित्सा

# दुधाळ जनावरांमधील रोगप्रसार आणि उपाययोजना



**डॉ. स्मिता कोल्हे**
(मो.नं. ९९७०४२५३८९)
**डॉ. आर.पी. कोल्हे**
क्रांतिसिंह नाना पाटील
पशुवैद्यकीय महाविद्यालय,
शिरवळ, जि. सातारा





दुधाळ जनावरे आजारी पडली तर त्यांची उत्पादन क्षमता कमी होते आणि आपले आर्थिक नुकसान होते. म्हणूनच दुधाळ जनावरांना रोग झाल्यास त्याची कारणे, रोगाचा प्रसार करणारी माध्यमे आणि उपाययोजना यांबद्दल आपल्याला माहिती असणे आवश्यक आहे.

दुधाळ जनावरांना होणाऱ्या रोगांचा प्रसार करणारी माध्यमे आणि त्यांवरील उपाय यांची माहिती प्रस्तुत लेखातून घेऊ.

**चारा किंवा पाण्यातून प्रसार :** दूषित चारा किंवा पाणी यातून मुख्यत्त्वे जनावरांत रोगप्रसार होतो. परोपजीवी रोग, आंत्रविषार, कॉलरा यांसारखे रोग दूषित चाऱ्यातून किंवा पाण्यातून पसरू शकतात.

**हवेतून प्रसार :** अनेक रोगांचे जंतू हे हवेतून इतरत्र पसरवले जातात. या मार्गाने अनेक बुरशीजन्य, विषाणुजन्य व मुख्यत्त्वे श्वसननलिकेचे रोग पसरतात. उदा. क्षयरोग, लाळखुरकूत इत्यादी



**संपर्कातून प्रसार :** काही रोगजंतू हे शरीरातून बाहेर पडणाऱ्या स्त्रावातून बाहेर पडतात व जेव्हा दोन जनावरे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संपर्कात येतात, तेव्हा या रोगांचा प्रसार होतो. उदा. बाह्य परोपजीवी, खरूज, नायटा वगैरे.

**कीटकांद्वारे प्रसार :** कीटक त्यांच्या अंगावर रोगजंतू वाहून नेतात किंवा रक्त शोषताना एका प्राण्यापासून दुसऱ्या प्राण्याच्या शरीरात रोगप्रसार करतात. उदा. गोचिडांमुळे थायलेरिओसिस आणि बॅबेसिओसिस रोग पसरतो.

**प्रजननातून प्रसार :** या काळात काही रोग हे नराकडून मादीकडे तर काही मादीकडून नराकडे प्रसारित होतात. यामध्ये मुख्यत्त्वे प्रजनन संस्थेशी निगडित रोगांचा अंतर्भाव होतो.

**प्रतिबंधात्मक उपाय**

१. आजारी जनावरांना कळपापासून तत्काळ दूर करावे व पशुवैद्यकाकडून योग्य ते उपचार करून घ्यावे.

२. लसीकरणाचा उपाय हा नेहमी होणाऱ्या व दरवर्षी येणाऱ्या रोगांचा प्रसार थांबवण्यास खूपच फायदेशीर आहे, त्यामुळे वेळोवेळी पशुवैद्यकाकडून आपल्या जनावरांचे लसीकरण करून घ्यावे. पशुवैद्यकाच्या सल्ल्याने वेळोवेळी जंतनाशके द्यावीत.

३. जनावरांच्या वाहतुकीतून अनेक रोग हे एका भागातून दुसऱ्या भागात पसरवले जातात. म्हणून एखाद्या रोगाच्या साथीत बाधित झालेल्या जनावरांना दुसरीकडे हलवू नये व बाहेरील जनावरे त्या भागात आणू नयेत.

४. एकाच चराई क्षेत्रावर वेगवेगळे कळप चारल्यास त्यांचा एकमेकांना रोगप्रसार होऊ शकतो, म्हणून जनावरे चारताना एकाच जागेवर चारून झाल्यावर काही दिवसांनंतर पुन्हा तेथे चारावी. मध्यंतरी काही काळ जाऊ द्यावा किंवा दुसऱ्या प्रकारची जनावरे तेथे चारावीत. जसे- गायी चरल्यास शेळी किंवा मेंढीस चरावयास सोडावे, म्हणजे रोगजंतूंचे जीवनचक्र तुटून रोगप्रसार थांबेल.

५. डास, माश्या, गोचिड हे रक्त शोषणाबरोबरच रोगही पसरवितात. म्हणून त्यांची उत्पत्ती स्थळे नष्ट करावीत. उकिरडा हा जनावरांच्या गोठ्यापासून दूर असावा. गोठ्यात साफसफाई ठेवून तेथे डास, माश्या होणार नाहीत याची काळजी घ्यावी. गोठ्याच्या सभोवताली पाणी साचणार नाही यासाठी उपाययोजना कराव्यात.

६. गोठ्यात वापरावयाची उपकरणे स्वच्छ व निर्जंतुक असावीत.

७. लैंगिक रोगांचा प्रसार रोखण्यासाठी निरोगी वळूपासून मिळविलेल्या वीर्याचा प्रसार कृत्रिम रेतनासाठी करावा.

८. जनावरांची देखभाल करणाऱ्या कामगारांना कोणत्याही व्याधी नसाव्यात. त्यांचे कपडे स्वच्छ असावेत.

९. मृत जनावराची शास्त्रशुद्ध विल्हेवाट लावावी.

१०. नवीन विकत आणलेली जनावरे काही दिवस कळपापासून दूर ठेवावीत. या काळात त्यांना होणारे रोग व त्यांच्या आरोग्याचे निरीक्षण करावे. नवीन जनावर निरोगी असेल तरच त्याला मुख्य कळपात घ्यावे. रोग आढळून आल्यास त्यावर त्वरित उपचार करावा, जनावर पूर्ण बरे झाल्यावर कळपात घ्यावे.

११. पशुवैद्यकाकडून जनावरांची नियमित तपासणी करून घ्यावी.

१२. जनावरांना आवश्यक मात्रेत सकस आहार द्यावा. ■